वाचले
१) शहर अभियंता यांचे कडील दि.१५/२/२०१८ चा प्रस्ताव
२) लेखा विभागाकडील दि.२०/२/२०१८ चा प्रस्ताव
३) शहर अभियंता यांचेकडील दि.१/३/२०१८ फेर प्रस्ताव
४) मा.आयुक्त यांचे कडील दि.७/३/२०१८ चा मंजुर प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८ लेखा विभाग.
लेखा/६/कावि/२९५१ /२०१८
दि:-०७/०३/२०१८

विषय :- लेखाशिर्षावरील एकत्रित तरतुदीतून सन २०१७ - १८ चे अंदाजपत्रकामधील तरतुदी कामाप्रमाणे खर्ची न टाकता एकूण लेखाशिर्षा मधून खर्ची टाकणे बाबत..

आदेश,

वाचले क्र. १ चे प्रस्तावान्वये शहर अभियंता यांनी स्थापत्य विभागाकडील अंदाजपत्रकामधील तरतुदी कामाप्रमाणे खर्ची न टाकता एकूण लेखाशिर्षामधून खर्ची टाकणे बाबत प्रस्तावित केले आहे. त्या अनुषंगाने लेखा विभागाकडील वाचले क्र.२ च्या प्रस्तावानुसार सन २०१७ -१८ च्या सुधारित अंदाजपत्रकात दायित्वानुसार तरतुदी उपलब्ध करून दिलेल्या असल्याने नियोजन बध्द कार्यवाही केल्यास तरतुदी वाया जाणार नाहीत. अशी या विभागाची धारणा आहे. असे कळविले होते.

तथापी, शहर अभियंता यांनी दि.१/३/२०१८ च्या प्रस्तावान्वये पुनश्च: लेखाशिर्षावरील एकत्रित तरतुदीतून खर्ची टाकणेबाबत व डॅशबोर्ड पध्दतीने कामाचे नावानिशी तरतुदी न वापरता एकत्रित शिल्लक रकमेमधून बिले खर्ची टाकण्यास मान्यता देण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुषंगाने लेखाशिर्षावरील शिल्लक तरतुदी मधून बिले खर्ची टाकताना ज्या कामांना पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत ती बिले प्राधान्याने खर्ची टाकावी. तद् नंतर कमी तरतुद आहे. परंतु बिले जादा रकमेची आहेत अशा कामांची बिले खर्ची टाकावी. थोडक्यात कोणत्याही परिस्थितीत तरतुद केलेली आहे.तथापी, अशी बिले खर्ची टाकलेली नाही अथवा अशा कामासाठी तरतुद शिल्लक राहिलेली नाही. अशी तक्रार उपस्थित होता कामा नये. बिले खर्ची टाकताना सन २०१७ -१८ चे सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुद मर्यादेतच बिले खर्ची टाकावीत. यासाठी संबधित विभागाने आवश्यक ते बदल डॅशबोर्ड वर प्रोबिटी सॉफ्टवेअर यांचे मार्फत करून घ्यावेत.

स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनिसारण,विद्युत, क्षेत्रिय कार्यालये, झोनिपु स्थापत्य, पर्यावरण इ. ज्या ठिकाणी भांडवली विकास कामे तसेच देखभाल दुरूस्तीची कामे केली जातात अशा सर्व विभागांनी या आदेशानुसार कार्यवाही करावी.

सन २०१७ -१८ चे सुधारित अंदाजपत्रकात दायित्वाच्या रक्कमा बिनचूक देण्यात आलेल्या नसल्याने संबंधितावर जबाबदारी निर्धारीत करुन तसा अहवाल सादर करावा.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

प्रत :- सर्व संबधित विभागप्रमुख

Scanned by CamScanner